# नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी)

## सभा क्र. १६

- वार :- बुधवार
- दिनांक :- १५.१०.२०२५
- वेळ :- सकाळी ११.०० वाजता
- स्थळ :- कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

# विषयावरील ठराव

# (इतिवृतांत)

**कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा**
सदर बझार, आर.टी.ओ. ऑफिस जवळ, सातारा
फोन नं. ०२१६२-२३०६३६, २३३००५
ईमेल - office@kbpcoes.edu.in
वेबसाईट - www.kbpcoes.edu.in

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

## *नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र १६. दि. १५.१०.२०२५ इतिवृतांत*

**जा. क्र. ग.ब.स./सभा १६/२०२५/** **दि. - १५.१०.२०२५**

**नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. १६**

**दिनांक - १५.१०.२०२५**

**वेळ - सकाळी ११.०० वाजता**

**स्थळ - कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा**

या महाविद्यालयाची नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) ची १६ वी सभा **बुधवार दि. १५.१०.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता** मा. आ. दिलीप वळसे पाटील साहेब - चेअरमन नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) यांचे अध्यक्षतेखाली सभा आयोजित केलेली आहे. तरी सर्व सन्माननीय सदस्यांनी सभेस उपस्थित राहून मार्गदर्शन करावे, ही विनंती.

| विषय | विषय | पान क्र. |
|---|---|---|
| विषय क्र. १ | मागील नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र १५. दि. २३.०८.२०२५ रोजीच्या सभेचे इतिवृत्तांत वाचून कायम करणे व घेतलेल्या निर्णयाची माहिती देणे. | |
| विषय क्र. २ | महाविद्यालयातील विविध उपक्रमांबाबत व कामकाजाबाबतची माहिती देणे. | |
| विषय क्र. ३ | महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता नेमणूक केलेल्या हंगामी ADHOC शिक्षक सेवकांच्या व रोजंदारी तत्वावर नेमलेल्या शिक्षकेत्तर सेवकांच्या पगाराबाबत चर्चा करून परवानगी घेणे. | |
| विषय क्र. ४ | भारतीय स्टेट बँकेच्या (State Bank of India) चालू खात्यासाठी NET Banking ची KYC करण्यासाठी संस्थेचा ठराव मिळणेसाठी परवानगी घेणेबाबत. | |
| विषय क्र. ५ | शिक्षक सेवकांनी सातव्या वेतन आयोगासंदर्भात सादर केलेल्या विविध अर्जाबाबत चर्चा करणे. | |
| विषय क्र. ६ | **मा. चेअरमन यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे** | |

**प्राचार्य तथा सचिव**
नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी)
कर्मवीर भाऊराव पाटील
अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

## *नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र १६. दि. १५.१०.२०२५ इतिवृतांत*

**जा. क्र. ग.ब.स./सभा १६/२०२५/** **दि. - १५.१०.२०२५**

**नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. १६**

**दिनांक - १५.१०.२०२५**

**वेळ - सकाळी ११.०० वाजता**

**स्थळ - कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा**

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय सातारा या महाविद्यालयाची नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) ची १६ वी सभा **बुधवार दि. १५.१०.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता** मा. आ. दिलीप वळसे पाटील साहेब - चेअरमन नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) यांचे अध्यक्षपदी ऑनलाईन / ऑफलाईन संपन्न झाली. या सभेस खालील मान्यवर उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य –**

| अ.क्र. | सदस्य नाव | पद |
|---|---|---|
| १. | मा. ना. दिलीप वळसे - पाटील साहेब | चेअरमन |
| २. | मा. चंद्रकांत दळवी साहेब IAS (Retd.)<br>चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा | निमंत्रित |
| ३. | मा. विकास देशमुख साहेब IAS (Retd.)<br>सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा | सदस्य |
| ४. | मा. प्रतापराव पवार | सदस्य |
| ५. | मा. डॉ. एन. बी. पासलकर | सदस्य |
| ६. | डॉ. सौ. एस. जे. मोदी | सदस्य |
| ७. | डॉ. सौ. एस. व्ही. माने | सदस्य |
| ८. | प्रा. डॉ. ए. सी. अत्तार | सदस्य / सचिव |

सर्वप्रथम सभेचे सदस्य सचिव तथा मा. प्राचार्य यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले तसेच जे सन्मानीय सदस्य सभेस गैरहजर आहेत त्यांची रजा मंजूर करण्यात करून मा. आ. दिलीप वळसे पाटील साहेब महाविद्यालयाचे नियामक मंडळाचे चेअरमन यांच्या अध्यक्षतेखाली सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय * सातारा

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

## *नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र १६. दि. १५.१०.२०२५ इतिवृतांत*

## विषयावरील ठराव

**विषय क्र. १. :- मागील नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र १५. दि. २३.०८.२०२५ रोजीच्या सभेचे इतिवृत्तांत वाचून कायम करणे व घेतलेल्या निर्णयाची माहिती देणे.**

**टाचण** :- मागील नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. १५, दि. २३.०८.२०२५ रोजीच्या इतिवृत्तांचे अवलोकन करून तो मंजूर करणेत यावा अशी विनंती आहे. तसेच मागील नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. १५, दि. २३.०८.२०२५ मध्ये घेण्यात आलेल्या निर्णयावरील कार्यवाही ठरावाअनुक्रमे खालील प्रमाणे आहे.

| ठराव | निर्णय | निर्णयावरील कारवाई |
|---|---|---|
| ठराव क्र.०१ | मागील नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र १४. दि. १०.०६.२०२५ रोजीच्या सभेचे इतिवृत्तांत वाचून कायम करणे व घेतलेल्या निर्णयाची माहिती देणे. | मागील सभेचा इतिवृत्तात वाचून सर्व सहमतिने कायम करणेत आला. |
| ठराव क्र.०२ | महाविद्यालयातील Center of Excellence करिता CSR Fund मधून एक कोटी रुपये इतकी रक्कम मिळवून दिलेबद्दल मा. प्रतापराव पवार यांचे आभार व रयत शिक्षण संस्थेमार्फत २५ लाख रक्कम दिल्याबाबत आभार ठराव. | याबाबत सभेने चर्चा करून मा. प्रतापराव पवार साहेब, Infra Solution Pvt. Ltd., Finolex Cable, Pune व रयत शिक्षण संस्थेचे मा. चेअरमन, मा. सचिव व सर्व सन्मानीय अधिकारी व पदाधिकारी यांचे आभार मानले. |
| ठराव क्र.०३ | शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून AI & DS या विभागातील विद्यार्थ्यांची संख्या १२० करणेबाबत व नवीन एम. टेक कोर्स कॉम्प्युटर सायन्स अॅन्ड इंजिनिअरिंग व सिव्हील इंजिनिअरिंग या विभागामध्ये Construction Management हा पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करणेबाबत चर्चा करणे. | सभेने चर्चा करून शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून AI & DS या विभागातील विद्यार्थ्यांची संख्या १२० करणेबाबत व कॉम्प्युटर सायन्स अॅन्ड इंजिनिअरिंग या विभागाचे एम.टेक कोर्स सुरु करण्यास व सिव्हील इंजिनिअरिंग या विभागामध्ये Construction Management हा पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यास सभेने परवानगी दिली. तसेच त्यासाठी लागणारी फी अदा करण्यास सभेने मान्यता दिली व त्यासाठी लागणारी कार्यवाही पूर्ण करावी असे सूचित केले. |
| ठराव क्र.०४ | **महाविद्यालयातील कामकाजाबाबतची माहिती देणे.**<br>• प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्षात प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांची माहिती देणे<br>• Center of Excellence बाबतची माहिती देणे.<br>• स्थानिक व्यवस्थापन समिती (LMC) बाबत माहिती देणे<br>• महाविद्यालयात सुरु असलेल्या बांधकाम व नवीन साहित्य खरेदी बाबत माहिती देणे.<br>• अभिनव इंजिनिअरिंग कॉलेज येथील स्थलांतरीत विद्यार्थ्यांची माहिती देणे. | १.सन २०२५-२६ मध्ये प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांच्या माहितीचे सभेने आवलोकन केले.<br>२. Center of Excellence सभेस दिली. सभेने चर्चा करून विद्यार्थ्यांना त्याचा कसा फायदा होईल याबाबत पुढील कार्यवाही करावी.<br>३. महाविद्यालयातील स्थानिक व्यवस्थापन समिती (LMC) मध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांच्या निवडीबाबत सभेस माहिती दिली. तसेच गठीत करण्यात आलेल्या स्थानिक व्यवस्थापन समिती (LMC) बाबत सभेने चर्चा करून अवलोकन करून सदर समितीची पुढील योग्य ती कार्यवाही करावी असे सूचित केले. |

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय सातारा

| | | |
|---|---|---|
| | | ४. सुरु असलेल्या बांधकाम व नवीन साहित्य खरेदी बाबत सभेस माहिती दिली.<br>५.अभिनव इंजिनिअरिंग कॉलेज येथील स्थलांतरीत विद्यार्थ्याची माहिती दिली व त्यांच्या फी बाबत चर्चा करण्यात आली. सदर विद्यार्थ्यांची प्रवर्गाप्रमाणे फी घेण्यात यावी असे सभेने सुचविले. |
| ठराव क्र.०५ | महाविद्यालयामध्ये नवीन स्वतंत्र ग्रंथालयासाठी इमारत बांधण्यासाठी चर्चा करणे. | याबाबत सविस्तर अहवाल तयार करून त्यासाठी लागणारी जागा व खर्च तसेच इतर परवानगी घेण्यासाठी आवश्यक असणारी रक्कम इ. बाबींचा अभ्यास करून पुढील सभेत विषय घेण्यात यावा असे ठरले. |
| ठराव क्र.०६ | **महाविद्यालयातील सेवकांनी सादर केलेल्या विविध अर्जाबाबत चर्चा करणे.**<br>१. Smartgencon 2025 Conference साठी महाविद्यालयातील तीन शिक्षक सेवकांना बाली येथे उपस्थित राहण्यासाठी येणाऱ्या प्रवासखर्चास परवानगी मिळणेसाठी सादर केलेल्या अर्जाबाबत मंजुरी घेणे.<br>२. सिव्हील इंजिनिअरिंग या विभागातील विद्यार्थ्यांची दुबई येथे शैक्षणिक सहल काढण्यास परवानगी घेणे.<br>३. Center of Excellence या सेंटर मध्ये सी. एन. सी. ट्रेनर घेणेबाबत. | सदर मुद्दा क्र. १, २ व ३ ला सभेने चर्चा करून मंजुरी दिली. |
| **विषय क्र. ७** | **महाविद्यालयातील आर्थिक बाबींची मंजुरी घेणे.** | -- |
| ठराव क्र. ७.२ | महाविद्यालयाच्या मुलांच्या व मुलींच्या वसतिगृहाच्या इमारतीची दुरुस्ती व कलरचे कामकाज करणेबाबत व प्राचार्य बंगलाचे नूतनीकरणाबाबत चर्चा करणे. | मुलांच्या व मुलींच्या वसतिगृहाच्या इमारतीची दुरुस्ती व कलरचे कामकाज करणेबाबत व प्राचार्य बंगलाचे नूतनीकरणाबाबत चर्चा करून अंदाजपत्रक तयार करून पुढील सभेमध्ये सादर करावे असे सूचित केले. |
| ठराव क्र. ७.३ | Research Policy बाबत चर्चा करून मान्यता घेणे. | महाविद्यालयाच्या नियामक मंडळातील सर्व सन्मानीय सदस्य यांना Research Policy कळविण्यात यावी व त्यांचे मत घेऊन पुढील कार्यवाही करावी असे सभेने सुचविले आहे.<br>तसेच नियामक मंडळाचे सन्मानीय सदस्य मा. उदय जाधव यांनी त्यास परवानगी दिलेली आहे. |
| ठराव क्र. ७.४ | Electrical Vehicle लॅब ची स्थापना करण्यासाठी चर्चा करणे व मंजुरी घेणे. | सदर लॅब ची स्थापना करण्यासाठी सभेमध्ये चर्चा करण्यात आली त्यामध्ये मा. प्रतापराव पवार साहेब यांनी Electrical Vehicle चे वापर सध्या कमी होत असल्याचे सूचित केले. |

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय सातारा

| | | |
|---|---|---|
| | | त्यानुसार याबाबत सविस्तर माहिती घ्यावी व तदनंतर Electrical Vehicle लॅब स्थापन करण्याबाबत विचार करण्यात येईल असे सभेने सुचविले. |
| ठराव क्र. ७.५ | शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांच्या पगारास व मानधनास परवानगी घेणेबाबत. | महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांच्या पगारास व मानधन अदा करणेबाबत सभेत याबाबत चर्चा करण्यात आली. त्यानुसार मा. प्रतापराव पवार साहेब यांनी हा विषय मा. डॉ. एन. बी पासलकर साहेब यांच्या अत्रेतला आहे. तरी महाविद्यालयातील ADHOC शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांचा मागील वर्षाचा शैक्षणिक व प्रशासकीय कामगिरी (Performance) पाहून निर्णय घ्यावा असे सुचविले. |
| ठराव क्र. ७.६ | संस्था डीलर कडून महाविद्यालयात सोलार पॅनल बसविण्यास व येणाऱ्या खर्चास परवानगी मिळणेबाबत. | सभेने चर्चा करून संस्था डीलर कडून सोलार पॅनल बसविण्यास व येणाऱ्या खर्चास परवानगी दिली. |
| ठराव क्र. ७.७ | EduSkills Connect मार्फत आयोजित केलेल्या Eduskill Connect 2025 & Eduskill HR Summit साठी उपस्थित राहण्यासाठी येणाऱ्या खर्चास परवानगी मिळणे बाबत. | सभेने चर्चा करून EduSkills Connect मार्फत आयोजित केलेल्या Eduskill Connect 2025 & Eduskill HR Summit साठी उपस्थित राहण्यासाठी येणाऱ्या खर्चास परवानगी दिली. |
| ठराव क्र. ७.८ | कु. प्रथा देवकर हिची शैक्षणिक फी माफ होणेबाबत आलेल्या अर्जाबाबत चर्चा करणे. | सभेने चर्चा करून अशा प्रकारे फी माफ करता येणार नाही भविष्यात अशा प्रकारचे विविध अर्ज येऊ शकतात त्यामुळे कोणालाही फी माफ करू नये असे सभेने सुचविले. |
| ठराव क्र. ०८ | महाविद्यालयातील शिक्षकेत्तर सेवकांना अकरा महिन्याचे नेमणूक आदेश देण्याबाबत चर्चा करणे. | याबाबत संस्था स्तरावर विचार विनिमय करून निर्णय घेण्यात यावा असे सभेने सुचविले. |
| **विषय क्र. ९** | **मा. चेअरमन यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.** | -- |
| ठराव क्र. ९.१ | VEETRAG Computers Pvt. Ltd. यांच्या कडून प्राप्त झालेल्या बिलाची रक्कम अदा करण्यास परवानगी मिळणेबाबत. | सदरचे बिल चालू आर्थिक वर्षात खर्ची टाकण्यास सभेने परवानगी दिली. |
| ठराव क्र. ९.२ | दिल्ली येथे आयोजित केलेल्या Conference साठी सिव्हील विभागातील पाच विद्यार्थ्यांची रजिस्ट्रेशन फी अदा करण्यास परवानगी घेणे. | सदरचे बिल चालू आर्थिक वर्षात खर्ची टाकण्यास सभेने परवानगी दिली. |
| ठराव क्र. ९.३ | श्री. पडवळ संदेश बळीराम लेखापाल यांच्या मागील संस्थेतील वेतनश्रेणी संरक्षित करून लागू करणेस परवानगी मिळणेबाबत. | श्री. पडवळ संदेश बळीराम लेखापाल या पदाची वेतनश्रेणी लागू करण्यास सभेची शिफारस असून त्यानुसार संस्था कार्यालयास पत्रव्यवहार करावा असे सभेने सुचविले. |

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय सातारा

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

## *नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र १६. दि. १५.१०.२०२५ इतिवृतांत*

वरील नुसार मागील नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. १५ मधील सर्व ठराव मा. प्राचार्य यांनी सभेस सांगितले व सभेने चर्चा करून अवलोकन केले.

**सूचक** :- **डॉ. सौ. माने एस. व्ही.**
**अनुमोदक** :- **मा. प्रतापराव पवार**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र :- ०२ - महाविद्यालयातील विविध उपक्रमांबाबत व कामकाजाबाबतची माहिती देणे.**

**टाचण** – शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये महाविद्यालयात खालील नुसार विविध उपक्रम घेण्यात आले आहेत. तसेच कौशल्य कामकाज करण्यात आलेले आहे.

**१. महाविद्यालयातील ISO Certification बाबत.**

महाविद्यालयास ISO Certification मिळविण्याच्या उद्देशाने दि. २३.०९.२०२५ रोजी ISO संस्थेमार्फत नियुक्त समितीने प्रत्यक्ष महाविद्यालयास भेट दिली होती. याभेटी दरम्यान समितीने महाविद्यालयातील शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला तसेच संबधित कागदपत्रांची तपासणी केली. तरी समितीच्या निरीक्षणानुसार लवकरच महाविद्यालयास ISO Certification प्राप्त होणार आहे.

महाविद्यालयास ISO Certification मिळाल्याने NAAC मान्यता प्रक्रीयेदरम्यान उच्च श्रेणी किंवा चांगले रॅकिंग मिळण्याची शक्यता वाढेल. तसेच या प्रक्रियेमुळे महाविद्यालयातील शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजामध्ये गुणवत्ता, कार्यक्षमता आणि सतत सुधारणा साध्य होऊन विद्यार्थ्यांना तसेच महाविद्यालयास एकूणच लाभ होऊल.

**२. "रयत अविष्कार संशोधन" प्रकल्पाबाबत.**

रयत शिक्षण संस्थेकडील दि. १०.०९.२०२५ रोजीच्या पत्रानुसार संस्थेच्या विविध वरिष्ठ महाविद्यालयात पदवी, पदव्युत्तर पदवी, पीएच.डी चे शिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थ्यामध्ये संशोधन वृत्ती वाढविण्यासाठी तसेच विद्यार्थ्यामधील संशोधन अभिवृत्तीस प्रोत्साहन देऊन उत्तम संशोधन घडविण्यासाठी महाविद्यालयात दि. २०.०९.२०२५ व दि. २१.०९.२०२५ या दोन दिवसीय कालावधीत

**"रयत अविष्कार संशोधन प्रकल्प"** महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेला होता.

यामध्ये महाविद्यालयातील सर्व विभागातील एकूण १०० विद्यार्थ्यांनी सक्रीय सहभाग घेतला होता. सहभाग घेतलेल्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या संशोधन कल्पनामध्ये पोस्टर्स आणि मॉडेल्स द्वारे त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पना सादर केल्या. तसेच सादर केलेल्या १०० विद्यार्थ्यापैकी २२ विद्यार्थ्यांची झोनल स्तरावरील फेरीसाठी सहभाग घेण्यास निवड झालेली आहे.

**३. आंतरराष्ट्रीय परिषद** Smartgencon 2025 **(बाली, इंडोनेशिया) मध्ये सहभाग.**

Udayana University, Indonesia & KLE Institute of Technology, Hubballi (India) यांच्या संयुक्त विद्यमाने 4th **SMARTGENCON 2025** हि प्रतिष्टीत आंतरराष्ट्रीय परिषद दि. ०६ ते १० ऑक्टोबर २०२५ दरम्यान Discovery Kartika Plaza Hotel, बाली इंडोनेशिया येथे आयोजित

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय सातारा

करण्यात अली होती. या परिषदेत ***Smart Generation Computing, Communication and Networking*** या विषयावरील नवीन संशोधन सादर करण्यात आले .

महाविद्यालयातील खालील प्राध्यापकांनी या परिषदेत प्रथमच प्रत्यक्ष सहभाग घेऊन संशोधन लेख सादर केला. "The Impact of Information Abundance Due to Artificial Intelligence (AI) in Engineering Education" (Paper ID: 1731) १.डॉ. सौ. मोदी शबिना जे. २.डॉ. सौ. माने सुनिता व्ही. ३. प्रा. सौ. शेख तरन्नुम आर. या सादरीकरणाद्वारे महाविद्यालयाची शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन संस्कृती आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील उपस्थिती अधोरेखित झाली. उपस्थित संशोधक आणि तज्ञांकडून सादरीकरणाला उत्तम प्रतीसास मिळाला आहे. परिषदेत सहभागी होण्याची प्रमुख उद्दिष्टे खालील प्रमाणे -

- अभियांत्रिकी शिक्षणातील कृत्रिम बुद्धीमत्तेमुळे निर्माण झालेल्या माहितीच्या विपुलतेच परिणाम अभ्यासणे
- आंतरराष्ट्रीय संशोधकांशी संवाद साधून नवीन तंत्रज्ञान व संशोधन दिशा जाणून घेणे.
- रयत शिक्षण संस्थेचा व महाविद्यालयाचा दर्जा जागतिक स्तरावर सादर करणे.
- भविष्यात संशोधन सहकार्य आणि ज्ञानविनिमयासाठी नेटवर्क निर्माण करणे.

४. **महाविद्यालयातील पहिली आंतरराष्ट्रीय परिषद** (International Conference) **व नामांकित जर्नलमधील परिषद प्रोसिडिंगच्या प्रकाशनाबाबत** .

महाविद्यालयामध्ये ऑगस्ट २०२४ मध्ये '**पहिली आंतरराष्ट्रीय परिषद** (**First International Conference**) आयोजित केली होती. या परिषदेमध्ये देश विदेशातील नामवंत शैक्षणिक संस्था, संशोधक, प्राध्यापक आणी विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. सदर परिषदे दरम्यान सादर झालेल्या संशोधन पत्रामध्ये आधुनिक तंत्रज्ञान, अभियांत्रिकी शिक्षणातील नवकल्पना तसेच संशोधन क्षेत्रातील नव्या प्रवाहांचा सखोल आढावा घेण्यात आला. या परिषदेत सादर झालेल्या निवडक संशोधनपत्रांचे प्रोसिडिंग प्रतिष्ठित **Indian Society of Technical Education (ISTE), New Delhi** यांच्या **"THE INDIAN JOURNAL OF OF TECHNICAL EDUCATION"** या नामांकित राष्ट्रीय जर्नलमध्ये प्रकाशित झालेले आहे. सदर आंतरराष्ट्रीय परिषदेचे मुख्य समन्वयक म्हणून संगणक अभियांत्रिकी विभागातील प्रा. सौ. घाटगे दिपाली दयानंद यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या प्रभावी नियोजन, समन्वयक आणि संघटन कौशल्यामुळे परिषद यशस्वीपणे पार पडली. या माध्यमातून महाविद्यालयाने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर आपले अस्तिव अधोरेखित केले असून भविष्यात शैक्षणिक आणी संशोधन उपक्रमांसाठी एक प्रेरणादायी पाऊल उचलले आहे.

५. **The Internal Smart India Hackathon** 2025

भारत सरकारच्या उपक्रमांतर्गत आयोजित **The Internal Smart India Hackathon** 2025 हि विद्यार्थ्यामध्ये नवोन्मेष समस्या सोडविण्याची क्षमता आणि तांत्रिक कौशल्य विकसित करण्यासाठी राबविण्यात येणारी योजना आहे. या उपक्रमांतर्गत प्रत्येक संस्थेला आंतरिक The Internal Hackathon स्पर्धा आयोजित करणे बंधनकारक आहे. त्यानुसार महाविद्यालयात दि. २०.०९.२०२५ व दि. २१.०९.२०२५ रोजी आंतरिक **The Internal Smart India Hackathon** 2025 आयोजित करण्यात आले. या स्पर्धेत एकूण १०७ संघांनी

सहभाग नोंदविला होता. त्यामध्ये कृषी, फूडटेक, ब्लॉकचेन, ग्रीन टेक्नॉलॉजी, मेडटेक, रोबोटिक्स, स्मार्ट ऑटोमेशन, स्मार्टव्हेईकल्स, स्मार्ट एज्युकेशन इ. विविध क्षेत्रातील समस्या विधानांवर उपाय सुचविले. या स्पर्धेमध्ये सर्व संघांनी आपले नवोन्मेष प्रकल्प सादर केले, परीक्षकांनी त्यांचे मूल्यमापन करून स्पर्धकांना सूचना दिल्या. या उपक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे विद्यार्थ्यांच्या सृजनशीलना आणि तांत्रिक कौशल्याचा वापर करून सामाजी व अद्योगिक समस्यांवर नवे उपाय शोधणे आणि राष्ट्रीय विकासात योगदान देणे होते. सदर उपक्रमाचे समन्वयक म्हणून डॉ. सौ. मोदी शबिना जे. व प्रा. क्षीरसागर अनिरुद्ध प्रकाश यांनी आयोजित केले होते.

**विषय क्र :- ०३. महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता नेमणूक केलेल्या हंगामी ADHOC शिक्षक सेवकांच्या व रोजंदारी तत्वावर नेमलेल्या शिक्षकेत्तर सेवकांच्या पगाराबाबत चर्चा करून परवानगी घेणे.**

**टाचण** – महाविद्यालयातील शैक्षणिक कामकाज सुरळीत सुरु ठेवण्यासाठी तसेच AICTE व विद्यापीठाच्या नियमानुसार महाविद्यालयात रिक्त असणारी शिक्षक सेवकांची पदे हि ADHOC हंगामी तत्वावर आवश्यकतेनुसार दरवर्षी महाविद्यालय नियामंक मंडळाची व संस्थेची परवानगीने घेऊन भरली जातात. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता संस्थेमार्फत विहित नमुन्यात जाहिरात देऊन शिक्षक सेवकांची पदे मुलाखती घेऊन हंगामी Adhoc तत्वावर नेमणूक करण्यात आलेली आहेत. त्यानुसार नेमणूक करण्यात आलेल्या शिक्षकांचा मागील वर्षातील Performance, संबधित विभागप्रमुखांनी दिलेला गोपनीय अहवाल या बाबींचा विचार करून त्यांचा अहवाल तयार करण्यात आला त्यानुसार महाविद्यालयाने १. मा. प्राचार्य २. IQAC समन्वयक ३. संबधित विभागप्रमुख यांची त्रिस्तरीय समिती स्थापन केली. सदर त्रिस्तरीय समिती मार्फत A, B, C, D या पद्धतीने वर्गीकरण करण्यात केले आहे. त्रिस्तरीय समितीचा अहवाल याबाबींचा विचार करून शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांचा पगार ठरविण्यात यावा.

तसेच शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता प्रसिद्ध केलेल्या जाहिराती नुसार एकूण ५५ पदे आवश्यक होती. परंतु यापैकी ४५ शिक्षकांची निवड झाली होती त्यापैकी ८ शिक्षक सेवक हे महाविद्यालयात रुजू झालेले नाहीत. शैक्षणिक कामकाजाकरिता एकूण ५५ adhoc शिक्षक सेवकांच्या पैकी ३९ शिक्षक महाविद्यालयात हजर झाले आहेत. उर्वरित रिक्त असलेल्या एकूण १६ adhoc शिक्षक सेवकांच्या नेमणूकी करिता नव्याने संस्थेची मान्यता घेऊन जाहिरात द्यावी लागेल व रिक्त पदे भरावी लागतील. त्यासाठी संस्था पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.

**आर्थिक तरतूद** - शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता महाविद्यालयातील विविध विभागामध्ये रयत शिक्षण संस्थेमार्फत नेमणूक केलेल्या हंगामी ADHOC शिक्षक सेवकांना दरमहा पगार देण्यासाठी आर्थिक तरतूद महाविद्यालयाकडे आहे.

**प्राचार्य शिफारस** - महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता नेमणूक केलेल्या हंगामी ADHOC शिक्षक सेवकांचे मागील वर्षातील Performance, संबधित विभागप्रमुखांनी दिलेला गोपनीय अहवाल व त्रिस्तरीय समितीच्या अहवालानुसार तसेच संबधित शिक्षकाने पगाराची केलेली मागणी इ. बाबींचा विचार विनीयम करून संबधित शिक्षक सेवकांचे पगार वाढ सुचवली आहे.तसेच सध्या रिक्त असलेल्या शिक्षक सेवकांच्या पदावर संस्था नियमानुसार जाहिरात देऊन शिक्षक पदे भरण्यास सभेने परवानगी द्यावी.

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय सातारा

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

## *नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र १६. दि. १५.१०.२०२५ इतिवृतांत*

**ठराव** - शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता नेमणूक करण्यात आलेल्या ADHOC शिक्षक सेवकांना दरमहा वेतन / पगारा बाबतची माहिती सभेस दिली. त्यानुसार सभेने चर्चा करून मागील वर्ष काम करणाऱ्या ADHOC शिक्षक सेवकांची नेमणूक झाली असेल अशा सेवकांना A, B, C, D या सुत्रानुसार पगार वाढ करण्यात यावी याकरिता पगार वाढ करताना खालील तक्त्यानुसार करावे.

| अ.क्र. | तपशील | टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|
| 1 | Total Marks Above 75 | 15% | A |
| 2 | Total Marks 61 to 75 | 10% | B |
| 3 | Total Marks 51 to 60 | 7% | C |
| 4 | Below 50 | 0 | D |

तसेच कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इंजिनिअरिंग या विभागातील ज्या शिक्षक सेवकांची वरील तक्त्यातील वेतनश्रेणी A असेल त्यांना २० % पगार वाढ देण्यात यावी व अपवादात्मक (Exceptions) सेवकांसाठी २५% पगार वाढ करण्यात यावी असे सभेने सुचविले.

वरील नुसार शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी नेमणूक केलेल्या ADHOC शिक्षक सेवक व रोजंदारी तत्वावर कामकाज करीत असलेल्या सेवकांचा पगार / मानधन तक्ता तयार करून त्यानुसार दरमहा अदा करण्यास सभेने परवानगी दिली.

तसेच रिक्त असलेल्या ADHOC शिक्षक सेवकांची संस्थेस पत्रव्यवहार करून संस्थेमार्फत पुनश्चः जाहिरात देऊन नेमणूक करण्यात येणाऱ्या शिक्षक सेवकांना पगार हा वरील तक्त्यानुसार ठरवून रिक्त पदे भरण्यास सभेने परवानगी दिली.

**सूचक** :- **मा. विकास देशमुख साहेब**
**अनुमोदक** :- **मा. प्रतापराव पवार साहेब**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र. ४ - भारतीय स्टेट बँकेच्या (State Bank of India) चालू खात्यासाठी NET Banking ची KYC करण्यासाठी संस्थेचा ठराव मिळणेसाठी परवानगी घेणेबाबत.**

**टाचण** - महाविद्यालयात गेल्या अनेक वर्षापासून भारतीय स्टेट बँकेची NET Banking सुविधा कार्यान्वित आहे. या सुविधेद्वारे महाविद्यालयाच्या भविष्य निर्वाह निधी, आयकर, व्यवसाय कर, वीजबिल, पाण्याचे बिल, दूरध्वनी बिल तसेच विद्यार्थ्यांशी संबधित विविध देयके यांचे भरणे NET Banking द्वारे करण्यात येते. अलीकडे भारतीय स्टेट बँकेकडून NET Banking संदर्भात KYC प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत सूचना प्राप्त झाली आहे. सदर KYC प्रक्रीयेसाठी संस्थेचा ठराव आवश्यक आहे. यासाठी महाविद्यालयाने दि. ०४.०६.२०२५ रोजीच्या पत्राने संस्था कार्यालयास ठराव मिळणेविषयी विनंती केलेली आहे. तथापि, आज रोजी पर्यंत संबधित ठराव प्राप्त न झाल्यामुळे सदर बँकेची KYC करण्यात आली नाही, त्यामुळे महाविद्यालयास विविध शासकीय देयकांच्या भरण्यास तांत्रिक अडचणी येत आहेत.

याबाबत सभेने चर्चा करून भारतीय स्टेट बँकेच्या NET Banking साठी आवश्यक KYC प्रक्रिया पूर्ण करण्याकरिता संस्थेचा ठराव मिळण्यासाठी सभेची परवानगी मिळावी.

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय * सातारा *

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

## *नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र १६. दि. १५.१०.२०२५ इतिवृतांत*

**प्राचार्य शिफारस** - महाविद्यालयातील सेवकांच्या भविष्य निर्वाह निधी, आयकर, व्यवसाय कर, वीजबिल, पाण्याचे बिल, दूरध्वनी बिल तसेच विद्यार्थ्यांशी संबधित विविध देयके हे NET Banking द्वारे भरण्यात येत असल्याने सध्या देयके अदा करताना तांत्रिक अडचणी येत आहेत त्यामुळे सभेने चर्चा करून भारतीय स्टेट बँकेच्या NET Banking साठी आवश्यक KYC प्रक्रिया पूर्ण करण्याकरिता संस्थेचा ठराव मिळण्यासाठी सभेने परवानगी द्यावी.

**ठराव** - महाविद्यालयातील सेवकांच्या भविष्य निर्वाह निधी, आयकर, व्यवसाय कर, वीजबिल, पाण्याचे बिल, दूरध्वनी बिल तसेच विद्यार्थ्यांशी संबधित विविध देयके यांचे भरणे NET Banking द्वारे करणे आवश्यक असल्याने याबाबत मा. प्राचार्य यांनी सभेस माहिती दिली. सभेने चर्चा करून भारतीय स्टेट बँकेच्या NET Banking साठी आवश्यक KYC प्रक्रिया पूर्ण करण्याकरिता संस्थेचा ठराव मिळण्यासाठी सभेने परवानगी दिली.

**सूचक** :- **मा. विकास देशमुख साहेब**
**अनुमोदक** :- **डॉ. सौ. माने एस. व्ही.**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र. ५ - शिक्षक सेवकांनी सातव्या वेतन आयोगासंदर्भात सादर केलेल्या विविध अर्जाबाबत चर्चा करणे.**

**टाचण –५.१. रयत शिक्षण संस्थेमार्फत तपासून आलेल्या सातव्या वेतन आयोगाच्या Fixation मध्ये दुरुस्ती होणेसाठी शिक्षक सेवकांनी सादर केलेल्या अर्जाबाबत.**

रयत शिक्षण संस्थेच्या दि. १०.०९.२०२५ रोजीच्या पत्रानुसार महाविद्यालयातील ज्या सेवकांनी रु. ५०० च्या स्टॅम्प पेपर वरील हमीपत्र सादर केले आहे अशा सेवकांना सातवा वेतन आयोग लागू करण्यात आलेला आहे. त्यानुसार खालील तक्त्यातील शिक्षक सेवकांनी सातव्या वेतन आयोगा लागू करणे संदर्भातील हमीपत्र सादर केले आहे. सदर सेवकांनी त्यांच्या सातव्या वेतन आयोगातील वेतन निश्चितीच्या तक्त्यामध्ये CAS II चे अंमबलबजावनी (Implement) होऊन दुरुस्ती होणेबाबत विनंती केली आहे.

या सेवकांची वेतन निश्चिती हि दि. ०१.०१.२०१६ रोजी असणाऱ्या सहाव्या वेतन आयोगा नुसारच्या पगारा वरती निश्चित केलेली आहे. परंतु, या सेवकांना सहाव्या वेतन आयोगातील CAS II ची अंमबलबजावनी (Implement) दि. ०१.०१.२०१६ नंतर केलेली असल्यामुळे त्याचा परिणाम सातव्या वेतन आयोगामध्ये वेतन निश्चिती मध्ये समाविष्ट करण्यात आलेला नाही. त्यामुळे तो करण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

याबाबत शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड येथील सेवानिवृत्त श्री. बरकडे सर, कार्यालय प्रमुख यांची समक्ष भेट घेतली व त्यांच्या कडून सातव्या वेतन आयोगातील वेतननिश्चिती बाबत मार्गदर्शन घेतले. यामध्ये त्यांनी सातव्या वेतन आयोगामध्ये दि. ०१.०१.२०१६ नंतर ज्यांना सहाव्या वेतन आयोगानुसार CAS II ची अंमबलबजावनी (Implement) केलेली आहे. अशा सेवकांची वेतन निश्चिती खालील तक्त्यामध्ये दिल्यानुसार करता येईल असे सांगितले. तरी याबाबत सभेने चर्चा करून योग्य मार्गदर्शन करावे.

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

*नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र १६. दि. १५.१०.२०२५ इतिवृतांत*

| अ.क्र. | शिक्षकांचे नाव | पद | शेरा |
|---|---|---|---|
| १. | डॉ. सौ. बल्लाळ सुनिता आर. | सहाय्यक प्राध्यापक | १ वेतन वाढ होते |
| २. | प्रा. दांगट गणेश डी. | सहाय्यक प्राध्यापक | १ वेतन वाढ होते |
| ३. | डॉ. सौ. माने. सुनिता व्ही. | सहाय्यक प्राध्यापक | १ वेतन वाढ होते |
| ४. | प्रा. शेख अमीर एम. | सहाय्यक प्राध्यापक | १ वेतन वाढ होते |
| ५. | प्रा. सौ. शेख तरन्नुम आर. | सहाय्यक प्राध्यापक | २ वेतन वाढ होते |
| ६. | प्रा. सौ. घाटगे दिपाली डी. | सहाय्यक प्राध्यापक | १ वेतन वाढ होते |
| ७. | प्रा. घाटगे दयानंद ए. | सहाय्यक प्राध्यापक | १ वेतन वाढ होते |

**प्राचार्य शिफारस** - रयत शिक्षण संस्थेच्या पत्रानुसार ज्या सेवकांनी रु. ५०० च्या स्टॅम्प पेपरवर हमीपत्र दिले आहे किंवा जे सेवक हमीपत्र सादर करतील, अशा सेवकांच्या सातव्या वेतन आयोगाच्या वेतननिश्चिती मध्ये दुरुस्ती करण्यास सभेने परवानगी द्यावी.

**ठराव** - महाविद्यालयातील तक्त्यातील शिक्षक सेवकांचे व रयत शिक्षण संस्थेच्या पत्रानुसार ज्या सेवकांनी रु. ५०० च्या स्टॅम्प पेपरवर सातव्या वेतन आयोग लागू करण्यासंदर्भातील हमीपत्र सादर करतील अशा शिक्षक सेवकांच्या सातव्या वेतन आयोगाच्या वेतननिश्चिती मध्ये दुरुस्ती करण्यास सभेने चर्चा करून परवानगी दिली.

**सूचक** :- **मा. विकास देशमुख साहेब**
**अनुमोदक** :- **मा. प्रतापराव पवार साहेब**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**प्राचार्य तथा सचिव**
नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी)
कर्मवीर भाऊराव पाटील
अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा